**सा.क्र.२ चा शपथेवर उलटतपास आरोपी क्र.२ करिता विधीज्ञ श्री.एन. एस. विधाते यांच्यामार्फत सुरु:**

**५.** मी शेती व्यवसाय करतो. मी सातारा परिसरात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सातारा परिसरातील गट नं.२१७ च्या मळ्यात राहतो. हे म्हणणे खरे आहे की, शेती व्यवसाय करत असल्यामुळे वादातीत मिळकत व इतर शेती मध्ये मला जाण्याचा रोज प्रसंग येतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ याच्याशी माझे व आमच्या कुटुंबाचे जिव्हाळ्याचे संबंध होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ हा संभाजीनगर परिसरातील अतिशय प्रतिष्ठीत व्यावसायीक होता. हे म्हणणे खरे आहे की, ते व्यावसायीक असल्यामुळे त्यांच्याकडे बरेच कर्मचारी कामाला होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ हे आरोपी क्र.१ कडे चालक म्हणून काम करत होते.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ चे आजसुध्दा माझे संबंध चांगले आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र.१ ने सातारा परिसरात पुष्कळ ले–आउट टाकलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ हा त्याचे सर्व व्यवहार स्वतः पहायचा याची मला माहिती आहे.

**७.** हे म्हणणे खरे नाही की, दि.१७.१०.१९९४ रोजी मी स्वतः व माझे काका उमाजी खंडुजी सोनवणे, वामनराव खंडुजी सोनवणे व शिवाजी गणपतराव सोनवणे यांनी आरोपी क्र.१ च्या हक्कात वादातीत मिळकतीसाठी नोटरीसमक्ष मुख्त्यारपत्र लिहून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, या मुख्त्यारपत्राच्या आधारे दि.२८.११.१९९४ रोजी आरोपी क्र.१ ने गट क्र.२१७ मधील ४ एकर क्षेत्रावर ले–आउट टाकला होता. हे म्हणणे खरे नाही की, दि.२५.०८.१९९८ रोजी नोंदणीकृत खरेदीखत क्र.३३७१/१९९८ प्रमाणे प्लॉट क्र.४० हा मी खरेदी केला होता व याची नोंद फेरफार क्र.७७१७ अन्वये झाली. हे म्हणणे खरे नाही की, विवादीत ले–आउटमधील अनेक खरेदीखतांवर मी, शिवाजी गणपतराव सोनवणे, हनुमान उमाजी,

वामनराव खंडुजी सोनवणे व उमाजी खंडुजी सोनवणे यांचे साक्षीदार म्हणून सह्या आहेत.

८. मी माधव लाकडे यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखत क्र.४२८१/२००९ दि.१८.०८.२००९ रोजीच्या खरेदीखतानुसार माधव लकडे यास मी खरेदी केलेला हा प्लॉट विकलेला आहे. हे मला माहीत नाही की, प्लॉट क्र.८६ चे खरेदीखत क्र.३२५९/१९९६ दि.१८.१२.१९९६ वर उमाजी खंडुजी सोनवणे यांची साक्षीदार म्हणून सही आहे. हे मला माहीत नाही की, प्लॉट क्र.८७ चे खरेदीखत क्र.४७३/१९९५ दि.१६.०२.१९९५ वर हनुमान उमाजी यांची साक्षीदार म्हणून सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वेगवेगळ्या व्यवहारासाठी वेगवेगळया सह्या करतो.

९. हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ मध्ये अशिष झंवर यांना जी जमीन विकली त्याच्याशी माझा काही संबंध नाही. दिवाणी दावा क्र.१०६२/२००४ (गणपत सोनवणे वि. उमाजी सोनवणे) यामध्ये विवादीत ले–आउट मधील प्लॉटधारकांना पक्षकार केल्याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, बोगस खरेदीखतांची माहीती मला सन २००८ मध्ये झाली.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ यांनी काय संगनमत केले व काय कागदपत्रे तयार केलीत याबद्दल मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ यांची फक्त साक्षीदार म्हणून सही असल्याने त्यांना आरोपी केले आहे. उमाजी खंडुजी सोनवणे, वामनराव खंडुजी सोनवणे व शिवाजी गणपतराव सोनवणे यांचे कधी निधन झाले याची तारीख वर्ष मला निश्चीत सांगता येणार नाही. हे मला माहीत नाही की, खरेदीखताचा स्टॅम्प माझे चुलत भाऊ हनुमंत उमाजी यांनी आणला होता. हे मला माहीत नाही की, गट क्र.२१७ ला लागून असलेल्या मिळकतीच्या किंमती वाढलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मिळकतींच्या किंमती वाढल्यामुळे मी व इतर जणांनी संगनमत करून दिवाणी दावा क्र.१०६२/२००४ हा दाखल करून

खोटा हुकुमनामा मिळविलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९५ ला जमीन विक्री केलेली असल्यामुळे फक्त क्लीअर टायटल मिळावं म्हणून मी खोटी तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेर तपास नाही.**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR

Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.08.18 17:18:15 +0530

(श्री. आर. एस. जांबोटकर)
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– १८/०८/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR

Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.08.18 17:18:23 +0530

(श्री. आर. एस. जांबोटकर)
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद